महा TEST SERIES/ PSI/ STI /ASO (२०१९)

**Kalyan-Nashik-Parbhani** संयुक्त पुर्व सराव परिक्षा पेपर **Marks: 100**

**PAPER NO. 6** **Test Series by : Nandini Manohar Patil** **Time: 1 Hour**

१. मोना एक काम दररोज ९ तासाप्रमाणे ७ दिवसात पूर्ण करते. जान्हवी तेच काम दररोज ७ तास काम करुन ६ दिवसात पूर्ण करते तर दोन्ही मिळून $८\frac{2}{5}$ तास प्रमाणे काम करुन ते काम किती दिवसात संपवतील?
अ) ३ ब) ४ क) ६ ड) ८

२. श्री मोहिते यांची मासिक मिळकत ३०,००० रु. आहे. ते घर खर्चासाठी ५०%, शिक्षणासाठी ८%, पत्नीसाठी १०% व किरकोळ खर्चासाठी ४२०० रुपये खर्च करतात व शिल्लक रक्कम बँकेत ठेवतात तर ते मिळकतीच्या किती टक्के रक्कम बँकेत ठेवतात?
अ) १/३% ब) २५% क) २% ड) १८%

३. एका वर्तुळाकृती बागेला चार पदरी कुंपण घालण्यासाठी १७६० मी. काटेरी तार लागली. त्या बागेच्या कडेने समान अंतरावर चार विजेचे खांब असतील, तर प्रत्येक दोन लगतच्या खांबातील अंतर किती मीटर असेल?
अ) ११० ब) ७०
क) ७०$\sqrt{2}$ ड) ११०$\sqrt{2}$

४. x हा y पेक्षा मोठा आहे. u व v हे w पेक्षा मोठे आहेत. w हा x व y यांच्या मधोमध येतो. u हा y पेक्षा मोठा येतो. तर पुढीलपैकी योग्य विधाने कोणते ते ओळखा?
अ) v हा u पेक्षा मोठा आहे. ब) u हा v पेक्षा मोठा आहे.
क) w हा y पेक्षा मोठा आहे. ड) x हा u पेक्षा मोठा आहे.

५. **विधान** : i) सर्व नद्या फुले आहेत.
ii) एकही फुल रस्ता नाही.
iii) काही फुले लाकुड आहेत.
**अनुमाने** : i) काही रस्ते लाकुड आहेत.
ii) एकही रस्ता लाकुड नाही.
iii) काही लाकुड नद्या आहेत.
अ) अनुमाने ii, iii बरोबर. ब) अनुमाने i, ii बरोबर
क) ii , iv अनुमान बरोबर. ड) अनुमाने ii, iii, iv बरोबर.

६. इंग्रजी वर्णमालेच्या अक्षरांना त्यांच्या वर्णमालेतील क्रमाप्रमाणे आकडे दिले असून त्यांच्यामध्ये गणिती प्रक्रिया करण्यात आली आहे. गणिती चिन्हांना पुढीलप्रमाणे सांकेतिक चिन्हे देण्यात आली आहेत. @ म्हणजे +, $ म्हणजे -, ★ म्हणजे x, © म्हणजे ÷ आणि □ म्हणजे =
या संकेतानुसार पुढीलपैकी कोणते समीकरण बरोबर आहे?
अ) E★D©B$C□X©H@Y$U
ब) Y$U@H©X$B□B★E
क) B$C©E★D@X□Y$U©H
ड) D★E©B□C$X@Y□U

७. एका रांगेत दर्शना डावीकडून ९ वी आहे. तिच्या उजवीकडे १२ व्या क्रमांकावर मनिषा आहे. मनिषा ही रांगेत उजवीकडून १५ वी येते. तर त्या रांगेत एकुण किती मुली आहेत?
अ) ३१ ब) ३५ क) ३० ड) ३२

८. त्रिकोण, पंचकोन, षटकोन खालील व्हेन आकृतीचा पर्याय निवडा.


अ)


ब)


क)


ड)

९. २०१५ या वर्षाची दिनदर्शिका कोणत्या वर्षाच्या दिनदर्शिकेशी समान असेल?
अ) २०१८ ब) २०२६
क) २०१९ ड) २०२१

१०. खालील आकृतीत प्रश्नचिंन्हाच्या जागी कोणता अंक येईल?




अ) ४१४ ब) ५१५ क) २७२ ड) ६१७

११. पुढे ÷, ×, +, − या चिन्हांचे अर्थ देण्यात आले आहेत.
१) P ÷ Q म्हणजे P चे वडील Q आहेत.
२) P × Q म्हणजे Q ची बहिण P आहे.
३) P + Q म्हणजे Q चा भाऊ P आहे.
४) P − Q म्हणजे P ची आई Q आहे.
यावरुन M, N, R व T सदस्य असलेल्या एका कुटुंबातील R ही N ची आजी आहे हे पुढीलपैकी कोणत्या विधानावरुन सिद्ध होते?
अ) M + N × T − R ब) N × R – M ÷ T
क) R − T ÷ M × R ड) N ÷ M + T – R

RELIABLE ACADEMY 9222333999

१२. रमेश, सुरेश, हमेश आणि भावेश हे चार मित्र आहेत. रमेश आणि महेश यांचे सरासरी वय ३५ वर्षे आहे. सुरेश आणि भावेशचे सरासरी वय ४० वर्षे आहे. रमेश वगळता इतर तिघांच्या वयाची सरासरी ४० वर्षे आहे. रमेश आणि भावेशच्या वयाची बेरीज सुरेश आणि महेशच्या वयाच्या बेरजेइतकी आहे. तर या चौघांचे वय अनुक्रमे किती आहे?
अ) ३५, ४०, ५५, ६० ब) ३५, ४०, ४५, ५०
क) ३०, ३५, ४०, ४५ ड) ३०, ४०, ५०, ६०

१३. L ही K ची सासू आहे तर K ही R ची सासू आहे तर R चे पती X चे कोण आहेत? X हे P चे वडील आहेत. तसेच K ही X ची सून आहे आणि P ला भाऊ व बहीण नाही.
अ) पुतण्या ब) मुलगा
क) नातु ड) सासरा

१४. निलिमा आपल्या कार्यालयातून सरळ पूर्वेकडे १३ मी. गेली त्यानंतर उजवीकडे वळुन ६ मी. गेली त्यानंतर पश्चिमेकडे ९ मी. गेली, तेथून डावीकडे वळुन ५ मी. गेली तर तिचे घर आले, अशा वेळी निलिमाच्या घरापासून तिचे कार्यालय किती अंतरावर असेल?
अ) १३० मी. ब) १३७ मी.
क) १३९ मी. ड) १४१ मी.

१५. यश, नीरज, राम, मेहूल आणि प्रकाश हे अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, वास्तूरचना, कला आणि व्यवस्थापना अभ्यासक्रम शिकत आहेत. त्यांना सितार, तबला, सरोद, गिटार आणि व्हायोलिन ही वाद्ये वाजविता येतात. मेहूल वैद्यकशास्त्राचा विद्यार्थी आहे आणि त्याला सरोद, सतार किंवा गिटार वाजवता येत नाही. प्रकाश अभियांत्रिकी किंवा व्यवस्थापन यापैकी कुठलाच अभ्यासक्रम शिकत नाही. कला शाखेचा विद्यार्थी राम तबला वाजवतो. ना प्रकाशला ना यशला गिटार किंवा व्हायोलिन वाजवता येते. व्यवस्थापन शास्त्राचा विद्यार्थी सरोद वाजवतो. या माहितीवरुन व्हायोलिन वाजवणारा विद्यार्थी कोणता अभ्यासक्रम शिकत आहे ते सांगा.
अ) वास्तुरचना ब) वैद्यकशास्त्र
क) व्यवस्थापन ड) अभियांत्रिकी

१६. खालीलपैकी १३ व्या वित्त आयोगासंबंधी योग्य विधान कोणते ते ओळखा?
१) १३ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष विजय केळकर आहे.
२) १३ व्या वित्त आयोगाचा कालावधी २०१० ते २०१५ आहे.
३) १३ व्या वित्त आयोगाचे सचिव सुमित बोस होते.
४) १३ व्या वित्त आयोगाचा अहवाल २७ डिसेंबर २००९ रोजी संसदेत मांडला.
अ) फक्त २ व ४ ब) फक्त १
क) फक्त ४ ड) वरील सर्व

१७. भारतीय बँकांच्या किसान पत कार्ड योजनेचा हेतू काय होता याबाबत खालील विधाने विचारात घ्या?
अ) शेतकऱ्यांसाठी दीर्घ मुदतीचे कर्ज
ब) शेतकऱ्यांसाठी पिकाचा विमा
क) शेतकऱ्यांसाठी अल्प मुदतीचे कर्ज
ड) गरीब लोकांसाठी सूक्ष्म वित्त.

१८. ११ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी काय आहे?
अ) २००० ते २००५ ब) २००५ ते २०१०
क) २००७ ते २०१२ ड) २००९ ते २०१४

१९. जनतेचा अल्पबचतीचा पैसा कोणत्या प्रकारच्या निधीत समाविष्ट केलेला असतो?
अ) आकस्मिक खर्च निधी ब) संचित व एकत्र निधी
क) सार्वजनिक लेखे ड) वरील सर्व

२०. खालीलपैकी कोणत्या बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन स्टेट बँक ऑफ इंडियाची (SBI) स्थापना करण्यात आली?
अ) पंजाब बँक ब) बँक ऑफ बॉम्बे
क) इंम्पिरिअल बँक ड) प्रेसिडेन्सी बँक

२१. खालील पर्यायातून योग्य विधाने कोणती ती ओळखा?
१) २०११ च्या जनगणनेचे 'घोषवाक्य आपली जनगणना आपले भविष्य' हे होते.
२) २०११ च्या जनगणनेची प्रगणिक शिक्षिका शुभंकर होती.
३) २०११ च्या जनगणनेचा खर्च २२०० कोटी रु. एवढा झाला.
४) जगात सर्वात जास्त लोकसंख्या चीन, भारत, अमेरिका, इंडोनेशिया व ब्राझील या राष्ट्राची आहे.
अ) फक्त ३ व ४ ब) फक्त १ व २
क) वरील सर्व ड) यापैकी नाही.

२२. चलनाच्या अवमूल्यनामुळे ......
अ) दोन राष्ट्रांमधील विश्वास वाढतो.
ब) बेरोजगारी वाढते.
क) निर्यात वाढते.
ड) आयात वाढते.

२३. खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे ते ओळखा?
१) वस्तू व सेवांचे अधिक उत्पादन झाल्यामुळे जी. डी. पी. मध्ये वाढ होते.
२) वस्तू व सेवांच्या किंमती वाढल्यामुळे जी. डी. पी. मध्ये वाढ होत नाही.
अ) दोन्ही योग्य ब) दोन्ही अयोग्य
क) फक्त १ योग्य ड) फक्त २ योग्य

२४. २०११ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचा क्रम लावा.
अ) नागपूर, अकोला, मुंबई उपनगर, मुंबई शहर
ब) नागपूर, अकोला, मुंबई शहर, मुंबई उपनगर
क) मुंबई उपनगर, मुंबई शहर, नागपूर, अकोला
ड) मुंबई उपनगर, मुंबई शहर, अकोला, नागपूर

२५. शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा कोणती बँक करते ?
अ) भूविकास बँक ब) नागरी बँक
ड) प्रादेशिक ग्रामीण बँक ड) जिल्हा मध्यवर्ती बँक

२६. खालील निधीतत्वासंदर्भात विधाने विचारात घेऊन चुकीचे विधान कोणते ते ओळखा?
१) रिझर्व्ह बँक सुरुवातीला (स्वातंत्र्यपूर्वकाळ) नोटांच्या छपाईबाबत प्रमाणशीर निधीतत्त्वाचा उपयोग करीत होते.

RELIABLE ACADEMY 9222333999

२) रिझर्व्ह बँकेला सुरुवातीला नोटांच्या दर्शनी मूल्याच्या ३० टक्के सोने किंवा परकीय चलनाचा पाठिंबा आवश्यक ठरत होता.
३) स्वातंत्र्योत्तर काळात भांडवलबाजाराचा विस्तार घडवून आणण्यासाठी प्रमाणशीर निधीतत्त्व रद्द करण्यात आले.
४) स्वातंत्र्योत्तर काळात देशातील चलनी नोटांचा पाठिंबा म्हणून ११५ कोटींचे परकीय चलन व ८५ कोटींचे सोने आवश्यक ठरविण्यात आले.
अ) २, ३ ब) वरील सर्व
क) २, ३, ४ ड) १, २, ४

२७. कोणत्या पंचवार्षिक योजनेदरम्यान किंमतीचा निर्देशांक कमी झाला होता ?
अ) पहिली पंचवार्षिक योजना ब) दुसरी पंचवार्षिक योजना
क) तिसरी पंचवार्षिक योजना ड) यापैकी नाही.

२८. योग्य जोडया लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) परजीव वनस्पती | i) भुछत्र |
| २) कीटकभक्षी वनस्पती | ii) दगडफूल |
| ३) मृतोपजीवी वनस्पती | iii) ड्रॉसेरा |
| ४) सहजीवी वनस्पती | iv) अमरवेल |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iii | iv |
| ब) | i | iii | iv | ii |
| क) | iii | iv | ii | i |
| ड) | iv | iii | i | ii |

२९. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा?
१) थॅलोफायटा विभागातील वनस्पतींना मूळ, खोड, पाने असे अवयव नसतात.
२) या विभागातील वनस्पती परपोषीद असतात.
३) या वनस्पतींचे शरीर मऊ व तंतूरुपी असतात.
अ) १ आणि २ योग्य ब) २ आणि ३ योग्य
क) १ आणि ४ योग्य ड) वरील सर्व योग्य

३०. योग्य जोडया लावा.

| | |
|---|---|
| १) यंत्र | i) रासायनिक ऊर्जा |
| २) अन्नपचन, उत्सर्जन | ii) गतिज ऊर्जा |
| ३) घरंगळणारा पदार्थ | iii) यांत्रिक ऊर्जा |
| ४) स्प्रिंग गुंडाळणे | iv) शारिरीक ऊर्जा |
| ५) लाकूड | v) स्थितिज ऊर्जा |

| | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| अ) | iii | ii | i | v | iv |
| ब) | iii | iv | ii | v | i |
| क) | iii | ii | iv | v | i |
| ड) | iii | i | iv | v | ii |

३१. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा?
१) बहुविभाजन - अमिबा
२) खंडीभवन - स्पायरोगायरा
३) पुनर्जनन - प्लॅनेरिया
४) मुकुलायन - हायड्रा
अ) २, ३, ४ ब) १, २, ३, ४
क) १, २, ४ ड) १, ३, ४

३२. सूक्ष्मजीवांसंबंधी पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा?
१) सूक्ष्मजीवांचे वर्गीकरण जीवाणू, विषाणू, कवक व आदिजीव इत्यादी प्रकारामध्ये करतात.
२) सूक्ष्मजीव एकपेशीय तसेच बहुपेशीय देखील असतात.
३) रोगास कारणीभूत ठरणाऱ्या सूक्ष्मजीवांना 'पॅथोजेन' असे म्हणतात.
४) लूई पाश्चरने 'पाश्चरायझेशन' आणि आंबवण प्रक्रियेचा शोध लावला.
अ) १, ३ आणि ४ ब) वरील सर्व
क) २, ३ आणि ४ ड) १, २ आणि ३

३३. खालील पर्यायातून योग्य जोडी कोणती ती ओळखा?
१) विद्युतधारा - कॅनडेला
२) पदार्थाची राशी - मोल
३) तेजस्वी तीव्रता - ॲम्पीअर
४) शक्ती - वॅट
अ) २ व ४ ब) २ व ३
क) १ व ४ ड) १, ३, ४

३४. $C_3H_8$ रेणूसूत्र असणाऱ्या प्रोपेन मध्ये ........... असतात.
अ) ८ सहसंयुज बंध ब) ६ सहसंयूज बंध
क) १२ सहसंयूज बंध ड) १० सहसंयूज बंध

३५. खालीलपैकी कोणती वनस्पती एकबीजपत्री आहे.
१) केळी २) बांबू ३) लसूण
४) तांदूळ ५) मका ६) ज्वारी
अ) २, ३, ४, ५ ब) १, २, ३, ४
क) १, ३, ४, ५, ६ ड) वरील सर्व

३६. खालील विधाने विचारात घ्या
१) बेडकामध्ये प्रजनन बाह्य फलनाद्वारे घडून येते.
२) आमिबाचे प्रजनन कलिकायन पद्धतीने होते.
३) अलैंगिक प्रजननमध्ये फलन होणे आवश्यक असते.
४) द्विविभाजन पद्धती ही अलैंगिक प्रजनन पद्धती आहे.
अ) १, ३ बरोबर २, ४ चूक ब) १, २ बरोबर ३, ४ चूक
क) १, ४ बरोबर २, ३ चूक ड) १, २, ३ बरोबर ४ चूक

३७. खालील विधानांचा विचार करा.
१) पोरीफेरा संघातील प्राण्यांच्या शरीरावर छिद्रे असतात.
२) प्रामुख्याने हे प्राणी खाऱ्या पाण्यात आढळतात.
३) सर्व प्रकारच्या स्पंजाचा समावेश या संघात होतो.
४) त्यांच्या सर्व शरीरावर असंख्य छिद्रे असल्याने त्यांना 'ऑस्ट्रिया' असे म्हणतात.
अ) फक्त १, २ आणि ३ योग्य ब) फक्त २ आणि ३ योग्य
क) फक्त ३ आणि ४ योग्य ड) सर्व योग्य

३८. खालीलपैकी कोणते विधान योग्य आहेत ते ओळखा?
१) कार्य होण्यासाठी ऊर्जेची गरज नसते.
२) ध्वनी हा ऊर्जेचे रुप नाही.
३) रासायनिक हे ऊर्जेचे रुप आहे.
४) ऊर्जेचे फक्त पारंपारिकच स्त्रोत आहेत.
५) ऊर्जा बचतीसाठी पारंपारिक स्त्रोतच वापरावे.
अ) फक्त १ व ५ ब) फक्त २ व ३
क) फक्त १, २, ५ ड) फक्त ३

RELIABLE ACADEMY 9222333999

३९. काही पदार्थ चुंबकीय क्षेत्रामध्ये असताना प्रतिकर्षण निर्माण होते. अशा पदार्थांना काय म्हणतात?
अ) फेरोमॅग्नेटिक पदार्थ ब) यापैकी नाही.
क) पॅरामॅग्नेटिक पदार्थ ड) डाय मॅग्नेटिक पदार्थ

४०. एखाद्या अणुच्या कक्षेला n या क्रमांकाने संबोधले, तर त्या कक्षेची ऊर्जापातळी खालीलपैकी कोणत्या सुत्राने काढता येते?
अ) $n^2$ ब) $३n^2$
क) $N^2$ ड) $२n^2$

४१. खालील विधाने विचारात घ्या.
१) ऑथ्रोपोडा संघ हा सर्वात मोठा संघ आहे.
२) या संघातील प्राण्यांच्या शरीरावर कायटीनयुक्त आवरण असते.
३) हे प्राणी एकलिंगी असून, लैंगिक प्रजनन करतात.
अ) फक्त २ योग्य ब) फक्त १ व ३ योग्य
क) फक्त १ आणि २ योग्य ड) तिन्ही योग्य

४२. खालील पर्यायातून अयोग्य जोडी कोणती ती ओळखा.
अ) स्वादुपिंड - स्वादुरस
ब) यकृत - पित्तरस
क) लहान आतडे - आजरस
ड) जठर - फुगवटे दिसणारा भाग

४३. आझाद हिंद सेनेसंदर्भात पुढील विधाने विचारात घेऊन अयोग्य विधान कोणते ते ओळखा?
१) मलेशिया व सिंगापूर येथील पराभूत भारतीय सैन्याचे मत परिवर्तन करुन आझाद हिंद सेना स्थापन केली.
२) आझाद हिंद सेना उभारण्याचा प्रथम प्रयत्न कॅ. मोहनसिंग यांनी केला होता.
३) ४ जुलै १९४३ रोजी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांनी स्वीकारले.
४) मे १९४४ रोजी आझाद हिंद सेनेने भारतीय हद्दीत चितगाव जवळील मोडोक परिसरात प्रवेश केला होता.
अ) २ अयोग्य ब) १, २ अयोग्य
क) यापैकी नाही ड) १ अयोग्य

४४. बाळशास्त्री जांभेकरांबाबत योग्य विधान कोणते ते ओळखा.
१) समाज जागृती करण्यासाठी १८३२ मध्ये 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरु केले.
२) वैज्ञानिक दृष्टिकोण प्रसारासाठी त्यांनी 'दिग्दर्शन' हे मासिक सुरु केले.
अ) १ ब) २
क) १, २ ड) यापैकी नाही.

४५. क्रांतीकारक व देश यांच्या योग्य जोडया लावा.
१) पांडुरंग खानखोजे i) जपान
२) रासबिहारी बोस ii) अफगाण
३) महेंद्र प्रताप iii) अमेरिका
४) विरेंद्रनाथ चटोपाध्याय iv) जर्मनी

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iii | iv |
| ब) | iii | ii | iv | i |
| क) | i | iv | ii | iii |
| ड) | iii | i | ii | iv |

४६. खालील विधानांमधुन अयोग्य विधान ओळखा.
१) महात्मा गांधी - हरिजन सेवा संघ
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - मुकनायक
३) गो. ग. आगरकर - सुधारक
४) न्या. रानडे - डेक्कन सभा
अ) ३, ४ ब) १, २, ३, ४
क) यापैकी नाही. ड) १, २, ३

४७. चार्ल्स वुडच्या खलित्यात खालीलपैकी कोणत्या तरतुदी होत्या?
१) भारतामध्ये शिक्षणाचा उद्देश पाश्चात्त्य शिक्षण प्रसार करणे.
२) उच्च शिक्षणाचे सर्वोत्तम माध्यम मातृभाषा
३) गावांत शिक्षणाच्या प्रसारार्थ देशीभाषिक प्राथमिक शाळांची स्थापना.
४) शिक्षण व्यवस्थेच्या तपासणीसाठी इन्स्पेक्टची नियुक्ती.
अ) फक्त १, २, ३ ब) फक्त १, ३, ४
क) फक्त १, ३ ड) वरील सर्व

४८. योग्य जोडया ओळखा. (उठाव - नेतृत्व )
१) नाशिक - शहाआलम दुसरा
२) औरंगाबाद - फिदा अली
३) सातारा - रंगो बापुजी
४) नरगुंद - भास्करराव भावे
अ) १, ३ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) १, २, ४

४९. लॉर्ड लिटनने रिचर्ड स्ट्रॅचीच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या दुष्काळ आयोगाने केलेल्या शिफारसीमध्ये पुढीलपैकी कोणत्या बाबीचा समावेश नव्हता?
१) दुष्काळ मदतीच्या खर्चाचा भार जमीनदारांनी उचलावा.
२) देशाची अन्नधान्याची गरज पूर्ण होईपर्यंत अन्नधान्य निर्यात करु नयेत.
३) दुष्काळी परिस्थितीत सरकारने लोकांना काम द्यावेत.
४) भूमीकरात सूट द्यावी किंवा ते कमी करावे.
अ) १, ४ ब) १
क) यांपैकी एकही नाही. ड) फक्त २

५०. खालील विधानांतून योग्य असलेले विधाने कोणते ते ओळखा?
१) माऊँट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा मुंबई इलाख्याचा पहिला गव्हर्नर होता.
२) महाराष्ट्राची विभागणी एल्फिन्स्टनने चार विभागात केली.
३) जिल्हाधिकारी हा जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी असतो.
४) एल्फिन्स्टनने निर्माण केलेली अधिकाऱ्यांची साखळी अखेरपर्यंत तशीच राहिली पाहिजे.
अ) १, ३ ब) फक्त १, २, ३
क) वरील सर्व ड) फक्त ३, ४

५१. पुढील पर्यायातून योग्य जोडया जुळवा.
१) ब्राह्मो समाज ऑफ इंडिया i) १८६६
२) तत्त्वबोधिनी सभा ii) १८३९
३) साधारण ब्राह्मो समाज iii) १८७८
४) ब्राह्मो समाज iv) १८२८

RELIABLE ACADEMY 9222333999

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | i | ii | iv | iii |
| ब) | iii | i | iv | ii |
| क) | i | ii | iii | iv |
| ड) | iv | ii | iii | i |

५२. उमाजी नाईकाबाबत योग्य विधाने कोणती ती ओळखा?
१) उमाजींनी रामोशी जमातीला संघटीत केले.
२) त्यांनी जाहीरनामा काढून इंग्रजांविरुद्ध लढा देण्याचे व झुगारुन देण्याचे आवाहन केले.
३) त्यांना १८३२ मध्ये जन्मठेप देण्यात आली .
४) त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा सहयाद्री पर्वत प्रदेशात दिला.
अ) २, ३, ४ ब) १, २, ३
क) १, २, ४ ड) वरील सर्व

५३. भारतात आयसीएस (ICS) पदासाठी स्पर्धा परिक्षा कोणत्या कायद्यानुसार व कोणत्या गव्हर्नर जनरलच्या काळात सुरु झाल्या?
अ) चार्टर ॲक्ट - १८५३ लॉर्ड डलहौसी
ब) चार्टर ॲक्ट - १८५३ लॉर्ड कॅनिंग
क) भारत परिषद कायदा - १८६१ लॉर्ड कॅनिंग
ड) चार्टर ॲक्ट - १८३३ लॉर्ड डलहौसी

५४. खालील पर्यायातून सविनय कायदेभंगाची वैशिष्टये सांगा.
१) धारासना सत्याग्रह
२) महिलांचा प्रथमच सहभाग
३) प्रतिसरकारची स्थापना
४) सरहद्द प्रांतात सत्याग्रह
अ) १, २, ४ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) वरील सर्व

५५. म्हैसूर लढाईबाबत अयोग्य विधान कोणते ते ओळखा?
अ) टिपू सुलतानाने मराठयांशी करार केला.
ब) हैदरअली लढाईत मारला गेला.
क) या लढाईत १७६९ मध्ये हैदरअलीने इंग्रजांना पराभूत केले.
ड) पहिल्या दोन लढायाचे नेतृत्व हैदरअलीने केले.

५६. बंगालच्या फाळणीनंतर भारतभर जनतेत जनजागृती घडून आली कारण................
अ) बकीमचंद्र चटर्जीच्या गीताला राष्ट्रीय महत्त्व देण्यात आले.
ब) वंगभंग आंदोलनातील लोकांचे ऐक्य वा लोकांचा इंग्रजांच्या कार्यक्रमावर बहिष्कार
क) या आंदोलनात इंग्रजांनी 'फोडा' व 'झोडा' नीतीचा अवलंब केला.
ड) जहालमतवादी नेत्यांनी देशभर जनजागृती घडवून आणली.

५७. खालीलपैकी कोणते कायदे राजाराममोहन रॉयच्या प्रयत्नांमुळे झालेले आहेत ते ओळखा?
१) सती बंदी कायदा
२) हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा
३) नरबळी बंदी कायदा
४) बालहत्या बंदी कायदा
अ) १, २, ४ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) १, ३, ४

५८. पार्कर सोलर प्रोब मोहिमेच्या संदर्भात कोणते विधान सत्य आहे.?
१) जून २०२५ मध्ये मोहिम समाप्त होणार आहे.
२) १९५८ साली पवन अस्तित्वात असल्याची भविष्यवाणी करणाऱ्या यूजीन पार्कर या खगोलशास्त्राचे नाव देण्यात आले आहे.
३) प्रवासाच्या दरम्यान प्रोब बुध ग्रहाच्या कक्षेत प्रवेश करणार.
अ) वरील सर्व ब) फक्त १
क) फक्त २ व ३ ड) फक्त २

५९. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा?
१) फिलिपीन्सची काट्रियोना ग्रेन हिने 'मिस युनिव्हर्स २०१८' चा मुकुट पटकावला आहे.
२) 'मिस वर्ल्ड २०१८' चा मुकुट मेक्सिकोच्या पोन्स डी लिऑन हिने पटकावला आहे.
३) 'मिस वर्ल्ड २०१७' चा मुकुट भारताची सौंदर्यवती मानूषी छिल्लरने पटकावला होता.
अ) फक्त २, ३ योग्य ब) वरील सर्व योग्य
क) फक्त १ योग्य ड) फक्त १, ३ योग्य

६०. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य ............... यांनी ११ डिसेंबर रोजी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला.
अ) उर्जित पटेल ब) सुरजीत भल्ला
क) राजदीप सरदेसाई ड) यांपैकी नाही.

६१. राष्ट्रीय पेन्शन योजनेमधील (एनपीएस) निवृत्तीच्या वेळी काढण्यात येणारी रक्कम .........% करण्यात येत असल्याची घोषणा वित्तमंत्री अरुण जेटली यांनी केली.
अ) १२०% करमुक्त ब) १५०% करमुक्त
क) १००% करमुक्त ड) यांपैकी एकही नाही.

६२. साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानला जाणारा यंदाचा 'ज्ञानपीठ पुरस्कार' प्रसिद्ध इंग्रजी लेखक ................ यांना जाहीर झाला आहे?
अ) अर्नब गोस्वामी ब) अमिताव घोष
क) झोरमथंगा ड) यांपैकी नाही.

६३. 'क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टम' (CCTNS) या ई - गव्हर्नंस (E – Governance) आधारित प्रोजेक्टच्या उत्कृष्ट अंमलबजावणी साठीचा केंद्रीय गृह मंत्रालयाचा पुरस्कार कोणत्या राज्याला देण्यात आला आहे?
अ) केरळ ब) आसाम्
क) आंध्रप्रदेश ड) महाराष्ट्र

६४. भारतीय वित्त मंत्रालयाने बँक ऑफ बडोदासह २ सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका विलीन करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्या पुढीलपैकी कोणत्या दोन बँका आहेत?
अ) पंजाब नॅशनल बँक आणि इलाहाबाद बँक
ब) कॉर्पोरेशन बँक आणि इंडियन बँक
क) युको बँक आणि सिंडिकेट बँक
ड) विजया बँक आणि देना बँक

RELIABLE ACADEMY 9222333999

६५. दि. १९ डिसेंबर २०१८ रोजी लोकसभेत 'सरोगसी (नियमन) विधेयक – २०१६' संमत झाले. त्यासंदर्भात कोणते विधान अचूक आहे?
१) विधेयकानुसार अपत्यहीन दाम्पत्याला नात्यातल्या महिलेच्या मदतीने मूल जन्मास घालणे शक्य होणार.
२) हे 'राष्ट्रीय सरोगसी मंडळ', 'राज्य सरोसगी मंडळ' यांची स्थापना करणे तसेच सरोगसी पद्धतीच्या नियमणासाठी योग्य अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची तरतूद प्रदान करते.
३) समलैंगिक संबंध असलेल्या, अविवाहित पालक किंवा 'लिव्ह इन रिलेशन'मधील जोडप्यांना भारतात सरोगसीच्या माध्यमातून परवानगी दिली जाणार नाही.
अ) फक्त १ ब) फक्त २ आणि ३
क) फक्त १ आणि २ ड) सर्व विधाने अचूक आहेत

६६. योग्य जोडया लावा.

| पुस्तक | लेखक |
|---|---|
| १) फियरलेस इन अपोजिशन | i) डॉ. एस. ए. कुरेशी |
| २) द मिनिस्ट्री ऑफ अॅटमोस्ट हॅपीनेस | ii) सुरेंद्र कुमार |
| ३) मोदीज मिडास टच इन फॉरेन पॉलिसी | iii) अरुंधती रॉय |
| ४) लोकतंत्र के उत्सव की अनकही कहानी | iv) पी. चिदंबरम् |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iv | iii |
| ब) | iii | ii | i | iv |
| क) | iv | iii | ii | i |
| ड) | i | ii | iii | iv |

६७. इंटरनेट व्यसनमुक्ती केंद्र कोठे उभारण्यात येणार आहे.
अ) पुणे ब) मुंबई
क) नागपूर ड) नाशिक

६८. वज्र – प्रहार २०१८ – लष्करी सराव कोणत्या दोन देशांमध्ये राजस्थान येथे झाला.
अ) भारत – रशिया ब) भारत - इंडोनेशिया
क) भारत - अमेरिका ड) भारत - जपान

६९. सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी केंद्रशासनाने सुरु केलेल्या योजनांमध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होत नाही?
अ) संपदा योजना
ब) बायो फोर्टीफाईड पीके
क) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना
ड) राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक कृषी बाजार

७०. खालीलपैकी योग्य पर्याय कोणता तो निवडा?
१) बिर्जीगमध्ये द्वितीय 'स्टार्टअप इंडिया गुंतवणूक परिसंवाद' आयोजित करण्यात आला होता.
२) दिनांक १२ नोव्हेंबर २०१८ रोजी चीनची राजधानी बिर्जींगमध्ये द्वितीय 'स्टार्टअप इंडिया गुंतवणूक परिसंवाद' आयोजित करण्यात आला होता.
३) स्टार्टअप इंडिया असोसिएशन (SIA) आणि व्हेंचर गुरुकूल सहभागीदारीने चीनमधील भारतीय दूतावासातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
४) भारतीय युवांमध्ये नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, चिनी कंपन्या आणि गुंतवणूकदारांना भारतीय स्टार्टअपपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते.
अ) फक्त २ व ३ ब) फक्त १ व ३
क) फक्त १, २, ३ ड) वरीलपैकी सर्व योग्य

७१. पंचायत राज्याच्या क्षेत्रात ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे खालीलपैकी कोणती तरतूद सुचविलेली नाही?
अ) पंचायत राज संस्था जर विसर्जित झाल्या तर सहा महिन्यांच्या कालावधीत निवडणुका झाल्या पाहिजेत.
ब) निर्वाचित पदाधिकाऱ्यांना जर दोनपेक्षा जास्त अपत्ये असतील, तर ते आपल्या पदावर राहण्यास अपात्र ठरतील.
क) राज्याने वित्त आयोगाची स्थापना केली.
ड) महिला उमेदवारांना सर्व स्तरांवर एक –तृतीयांश आरक्षण.

७२. अनुच्छेद १५७ - कोणतीही व्यक्ती, ती भारतीय नागरिक आणि वयाची ......... वर्षे पूर्ण झाल्याशिवाय राज्यपालपदावर नियुक्तीस पात्र असणार नाही.
अ) २१ ब) २५
क) ३० ड) ३५

७३. बेसल कराराचा संबंध खालीलपैकी कशाशी निगडित आहे.
अ) धोकादायक कचऱ्याची वाहतूक आणि साठवणूक
ब) जैवविविधतेस धोका
क) वाळवंटीकरण
ड) घन कचऱ्यांचे व्यवस्थापन

७४. 'न्यायालयीन पुनर्विलोकना' बाबत खालील विधाने विचारात घेऊन योग्य पर्याय निवडा?
१) न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे विधीमंडळाने केलेल्या कायद्यांची आणि केंद्र आणि राज्य शासनाच्या कार्यकारी आदेशांची घटनात्मकता तपासून पाहण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार.
२) संघराज्यीय समतोलपणा साधणे आणि राज्यघटनेची सर्वोच्चता या तत्त्वाचे रक्षण करणे हे न्यायालयीन पुनर्विलोकनाचे उद्दिष्ट असते.
३) 'कायद्याने घालून दिलेल्या पद्धती' पेक्षा 'कायद्याची योग्य पद्धत' हे तत्त्व सर्वोच्च न्यायालयाची नागरिकांचे मुलभूत हक्क रक्षणासाठी अधिक व्याप्ती वाढविते.
अ) वरील सर्व ब) वरीलपैकी एकही नाही.
क) फक्त १ ड) फक्त १ आणि २

७५. राष्ट्रपतींच्या अधिकारसंदर्भात खालील विधाने विचारात घ्या.
१) राष्ट्रपती सर्व सैन्य दलांचे सरसेनापती असतात.
२) राज्यसभेत १२ सभासदांची नियुक्ती राष्ट्रपती स्वेच्छाधीन अधिकारात करतात.
३) राष्ट्रपती संसदेच्या प्रत्येक अधिवेशनाच्या सुरुवातीला दोन्ही सभागृहासमोर अभिभाषण देऊ शकतात.
४) राष्ट्रपती परदेशात भारताचे प्रतिनिधित्व करतात.
वरीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ते ओळखा?
अ) १ आणि २ ब) १, ३ आणि ४
क) १ आणि ३ ड) २, ३ आणि ४

RELIABLE ACADEMY 9222333999

७६. योग्य जोडया लावा.

| सूची 'अ' (मुलभूत हक्क) | सूची 'ब' (कलमे) |
|---|---|
| १) समतेचा हक्क | i) कलम २५ ते २८ |
| २) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क | ii) कलम १४ ते १८ |
| ३) शोषणाविरुद्धचा हक्क | iii) कलम २३ ते २४ |
| ४) संविधानिक उपाययोजनेचा हक्क | iv) कलम ३२ ते ३५ |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iii | iv |
| ब) | i | ii | iii | iv |
| क) | iii | iv | i | ii |
| ड) | i | iii | ii | iv |

७७. सरपंचाच्या कार्याशी संबंधित असलेले विधान विचारात घेऊन योग्य पर्याय निवडा?
१) ग्रामपंचायत आणि ग्रामसभेच्या बैठकी आमंत्रित करुन अध्यक्षस्थान भुषविणे.
२) कर गोळा करणे आणि ग्रामपंचायतीच्या कामाचा वार्षिक अहवाल तयार करणे.
३) ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारावर देखरेख ठेवणे.
४) ग्रामपंचायतीची महत्त्वाची कागदपत्रे आणि हिशेब सांभाळणे.
अ) २, ३, ४ ब) १, २ आणि ३
क) वरील सर्व ड) १, ३ आणि ४

७८. योग्य जोडया लावा.

| भारतीय राज्यघटनेतील परिशिष्टे | तपशील |
|---|---|
| १) सातवे परिशिष्ट | i) कार्यालयीन भाषा |
| २) नववे परिशिष्ट | ii) जमीन सुधारणा कायदा |
| ३) आठवे परिशिष्ट | iii) केंद्र आणि राज्यांमध्ये अधिकार वाटप. |
| ४) बारावे परिशिष्ट | iv) नगरपालिकांचे अधिकार, अधिसत्ता आणि जबाबदारी |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | i | iii | iv | ii |
| ब) | iv | iii | ii | i |
| क) | ii | i | iii | iv |
| ड) | iii | ii | i | iv |

७९. ग्रामसभेसंबंधीच्या खालील विधानांचा विचार करुन योग्य पर्याय निवडा.
१) तो पंचायती राज्यातील सर्वात कनिष्ठ स्तर आहे.
२) ७३ व्या राज्य घटनादुरुस्तीने तिला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.
३) ग्रामसभेत ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या सर्व पात्र मतदारांचा समावेश होतो.
४) वित्तीय वर्षामध्ये ग्रामसभेच्या चार बैठका घ्याव्या लागतात.
अ) फक्त १, २ आणि ३ ब) फक्त १
क) फक्त २ आणि ३ ड) वरील सर्व

८०. राज्यपाल पदाबाबत 'सरकारिया आयोगाने' खालीलपैकी कोणत्या सूचनेची शिफारस केली नव्हती?
अ) कार्यरत राजकारणी राज्यपाल म्हणून नेमले जाऊ शकतील.
ब) जर घटकराज्यात आणि केंद्रपातळीवर भिन्न राजकीय पक्ष सत्तेवर असतील, तर राज्यपाल केंद्रातील सत्ताधीश पक्षाचा असू नये.
क) राज्यपाल पद रद्द केले जाऊ नये.
ड) राज्यपालांची निवड घटकराज्यांनी दिलेल्या नामसूचीतून केली जाऊ नये.

८१. ७३ व्या घटनादुरुस्तीने कोणत्या तरतुदी करणे राज्यांसाठी बंधनकारक नाही?
अ) सर्व स्तरांवरील निवडणुकांमध्ये महिलांसाठीचे आरक्षण
ब) प्रत्येक गाव अथवा ग्रामसमूहामध्ये ग्रामसभांची स्थापना
क) अकराव्या अनुसूचीतील सर्वच्या सर्व २९ विषयांचे स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरण
ड) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरावर संस्थांची स्थापना

८२. खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे ते ओळखा?
१) मंत्रीमंडळातील जो मंत्री संसदेचा सभासद नसतो, त्यास सहा महिन्याच्या आत संसदेवर निवडून यावे लागते.
२) मंत्रीमंडळ लोकसभेत जबाबदार असते.
३) राष्ट्रपतींना मंत्रीमंडळांच्या सल्ल्यानुसार काम करावे लागते.
४) मंत्रीमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीने विचारात घेतलाच पाहिजे असे नाही.
अ) फक्त ४ ब) फक्त २
क) फक्त १ व २ ड) फक्त २, ३, ४

८३. 'जिल्हा नियोजन आणि विकास मंडळे स्थापन करण्याची शिफारस कोणत्या समितीनी केली.?
अ) पी. बी. पाटील समितीने
ब) बलवंतराय मेहता समितीने
क) एल. एन. बोंगीरवार समितीने
ड) वसंतराव नाईक समितीने

८४. केंद्र व राज्ये यांच्यातील खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या संबंधांना म्युनिसिपल रिलेशन्स असे संबोधले जाते?
१) राज्याच्या कायदे करण्याच्या अधिकारावरील केंद्राचे नियंत्रण
२) राज्याच्या आर्थिक बाबीवरील केंद्राचे नियंत्रण
३) राज्याच्या प्रशासकीय क्षेत्रावरील केंद्राचे नियंत्रण
४) राज्याच्या योजना प्रक्रियेवरील केंद्राचे नियंत्रण
अ) फक्त ४ ब) फक्त १
क) फक्त ३ ड) फक्त २

८५. काराकोरम् पर्वतश्रेणी बाबत योग्य विधाने कोणती ती ओळखा?
१) ही पर्वत श्रेणी पामीर पठाराच्या आग्नेय दिशेस आढळते.
२) हिमालयाच्या उत्तरेकडील काराकोरम् पर्वत प्रणाली ही 'ट्रान्स प्रणाली' म्हणून ओळखली जाते.
३) या पर्वत श्रेणीत 'के – २' हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे शिखर आहे.

RELIABLE ACADEMY 9222333999

४) या पर्वत श्रेणीत पहिल्या क्रमांकाचे 'माऊंट एव्हरेस्ट' हे शिखर आहे.

अ) १, ४ ब) २, ३, ४
क) १, २, ३ ड) सर्व बरोबर

८६. महाराष्ट्रातील नदी लांबीचा चढत्या क्रमाने योग्य पर्याय निवडा.

अ) कृष्णा – वैनगंगा – भिमा – वर्धा
ब) तापी – वैनगंगा – वर्धा – भिमा
क) वर्धा – भिमा – वैनगंगा – तापी
ड) गोदावरी – वर्धा - कृष्णा - वैनगंगा

८७. योग्य जोडया लावा.

| प्रदेश | प्राणी |
|---|---|
| १) गवताळ प्रदेश | i) रेनडिअर |
| २) विषुववृत्तीय सदाहारित वने | ii) अजगर |
| ३) उष्ण ओसाड प्रदेश | iii) उंट |
| ४) शीत ओसाड प्रदेश | iv) हरिण |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iii | ii | iv | i |
| ब) | iii | ii | i | iv |
| क) | iv | ii | iii | i |
| ड) | iii | i | iv | ii |

८८. क्षेत्रफळानुसार उतरत्या क्रमाने महाराष्ट्रातील प्रशासकीय विभागाचा योग्य क्रम असलेला पर्याय निवडा.

१) नागपूर २) नाशिक
३) अमरावती ४) पुणे

अ) २, ४, ३, १ ब) २, ४, १, ३
क) ४, २, १, ३ ड) १, २, ४, ३

८९. शिवालिक रांगेबाबत योग्य विधाने ओळखा.

१) हिमालयाच्या अती उत्तरेकडील रांगा
२) शिवालिक व लघु हिमालय यांच्या दरम्यानच्या दऱ्यांना 'डून' असे म्हणतात.
३) पश्चिम भागामध्ये त्या अधिक स्पष्ट दिसतात.
४) पश्चिम भागाप्रमाणे त्या पुर्वेकडील भागातही अधिक स्पष्ट दिसत नाहीत.

अ) २, ४ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) वरील सर्व

९०. खालील पर्यायातून अयोग्य पर्याय निवडा?

अ) २१ मार्च या दिवशी दोन्ही गोलार्ध, दिवस – रात्र सम समान असतात.
ब) २१ जून, रोजी उत्तर गोलार्धात दिवस सर्वात मोठा असतो.
क) २२ डिसेंबर रोजी दक्षिण गोलार्धात रात्र सर्वात मोठी असते.
ड) २२ डिसेंबर रोजी उत्तर गोलार्धात रात्र सर्वात मोठी असते.

९१. योग्य जोडया लावा

| किल्ले | जिल्हा |
|---|---|
| १) हाजीमलंगड | i) नाशिक |
| २) अलंग - कुलंग | ii) ठाणे |
| ३) चंदन - वंदन | iii) रायगड |
| ४) खांदेरी - उंदेरी | iv) सातारा |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iv | iii |
| ब) | iii | iv | ii | i |
| क) | iv | i | iii | ii |
| ड) | ii | iii | i | iv |

९२. भारतीय पठाराची योग्य वैशिष्टये कोणती ती ओळखा?

१) सर्वात प्राचीन भूभाग व सर्वात स्थिर प्रदेश.
२) सर्वात मोठा प्राकृतिक विभाग व त्रिकोणाकृती आकाराचा प्रदेश.
३) प्राचीन अग्नीजन्य व रुपांतरित खडकांनी बनलेला प्रदेश.
४) सुपीक काळी मृदा व खनिज संपत्तीनी संपन्न प्रदेश.

अ) १, २, ४ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) वरील सर्व

९३. हो हँग हो या नदीचे वैशिष्टये पुढीलपैकी कोणते आहेत ते ओळखा?

१) या नदीला पीत नदी असे म्हणतात.
२) या नदीवर जगातील सर्वात मोठे धरण आहे.
३) या नदीने आणलेल्या गाळापासून लोएसची निर्मिती झालेली आहे.
४) या नदीला चीनचे दु:खाश्रू असे म्हणतात.

अ) १, ३, ४ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) वरील सर्व

९४. पिकासाठी योग्य सुपीक मृदेचा उतरता क्रम असलेला योग्य पर्याय ओळखा.

अ) गाळाची मृदा, तांबडी मृदा, रेगुर मृदा, पर्वतीय मृदा
ब) गाळाची मृदा, रेगुर मृदा, तांबडी मृदा, पर्वतीय मृदा
क) रेगुर मृदा, गाळाची मृदा, तांबडी मृदा, पर्वतीय मृदा
ड) पर्वतीय मृदा, रेगुर मृदा, गाळाची मृदा, वालुकामय मृदा

९५. भारताच्या शेजारील देशामध्ये सर्वात कमी सीमेकडून सर्वाधिक सिमा लागलेल्या देशांचा क्रम असलेला पर्याय सांगा.

अ) नेपाळ, भूतान, चीन, बांग्लादेश
ब) भूतान, ब्रम्हदेश, नेपाळ, चीन
क) अफगाणिस्तान, नेपाळ, चीन, पाकिस्तान
ड) बांग्लादेश, चीन, पाकिस्तान, नेपाळ

९६. योग्य जोडया लावा.

| पिके | संशोधन केंद्र |
|---|---|
| १) द्राक्ष संशोधन केंद्र | i) उरळी कांचन |
| २) आंबा संशोधन केंद्र | ii) दापोली |
| ३) कापूस संशोधन केंद्र | iii) अकोला |
| ४) भात संशोधन केंद्र | iv) कर्जत |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iii | iv |
| ब) | ii | iii | i | iv |
| क) | i | ii | iii | iv |

RELIABLE ACADEMY 9222333999

ड) iv iii ii i

९७. महाराष्ट्रातून खालीलपैकी कोणते राष्ट्रीय राजमार्ग जातात?

१) NH – ३ २) NH – ४

३) NH – ७ ४) NH – ८

अ). १, ३, ४ ब) १, २, ३

क) २, ३, ४ ड) वरील सर्व.

९८. खालील विधानामधून अयोग्य विधाने कोणती ती ओळखा?

१) उन्हाळयात कारवार व मलबार किनाऱ्यावर पडणाऱ्या पर्जन्यास 'चेरी ब्लॉसम शॉवर' असे म्हणतात.

२) कालबैसाखी वारे बाष्पयुक्त असतात व ते उन्हाळयात वाहतात.

३) नॉर्वेस्टर वारे उत्तर प्रदेश व बिहार मधून वाहणारे बाष्पयुक्त व कोरडे वारे आहेत.

४) उन्हाळयात पठारावर गडगडासह वादळी पर्जन्य पडतात त्यास 'वळीवाचा पाऊस' असे म्हणतात.

अ) २, ३ ब) १, ३

क) २, ४ ड) यापैकी नाही.

९९. महाराष्ट्रातील खाडयाचा दक्षिणेकडून उत्तरेकडे असणारा योग्य क्रम लावा.

अ) दाभोळ, धरमतर, वसई, जयगड, भाटये

ब) वसई, धरमतर, दाभोळ, जयगड, भाटये

क) धरमतर, वसई, जयगड, दाभोळ, भाटये

ड) भाटये, वसई, जयगड, दाभोळ, धरमतर

१००. सूर्यमालेसंबंधी पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा?

१) सिलीकॉन हे पृथ्वीच्या निर्मितीमधील सर्वात महत्वपूर्ण मूलद्रव्य आहे.

२) पृथ्वीची घनता इतर सर्व ग्रहांपेक्षा जास्त आहे.

३) सुर्यमालेतील एकूण वस्तूमानापैकी ७५% वस्तूमान सूर्याचे आहे.

४) सूर्याचा व्यास पृथ्वीच्या १९० पट आहे.

अ) ३ आणि ४ ब) २ आणि ३

क) फक्त २ ड) फक्त १

RELIABLE ACADEMY 9222333999

The Name Of Quality Reliable Academy® Founder : Manohar E. Patil ISO 9001 : 2015

महा TEST SERIES / PSI / STI / ASO (२०१९)

Kalyan-Nashik-Parbhani संयुक्त पूर्व सराव परिक्षा पेपर Marks: 100

Paper No: 6 TEST SERIES BY : Nandini Manohar Patil Time: 1 hr.

**PAPER NO. 6 (ANS. KEY)**

| प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | २६ | क | ५१ | क | ७६ | अ |
| २ | ड | २७ | अ | ५२ | क | ७७ | ब |
| ३ | क | २८ | ड | ५३ | अ | ७८ | अ |
| ४ | क | २९ | क | ५४ | अ | ७९ | अ |
| ५ | क | ३० | ब | ५५ | अ | ८० | अ |
| ६ | अ | ३१ | ब | ५६ | ब | ८१ | क |
| ७ | ब | ३२ | क | ५७ | ड | ८२ | अ |
| ८ | ब | ३३ | अ | ५८ | अ | ८३ | क |
| ९ | ब | ३४ | ड | ५९ | ब | ८४ | क |
| १० | ब | ३५ | ड | ६० | ब | ८५ | क |
| ११ | ड | ३६ | क | ६१ | क | ८६ | ब |
| १२ | क | ३७ | ड | ६२ | ब | ८७ | क |
| १३ | क | ३८ | ड | ६३ | ड | ८८ | ब |
| १४ | ब | ३९ | ड | ६४ | ड | ८९ | क |
| १५ | ब | ४० | ड | ६५ | ड | ९० | क |
| १६ | ड | ४१ | ड | ६६ | क | ९१ | अ |
| १७ | अ | ४२ | ड | ६७ | अ | ९२ | ड |
| १८ | क | ४३ | क | ६८ | क | ९३ | अ |
| १९ | क | ४४ | क | ६९ | ब | ९४ | ब |
| २० | क | ४५ | ब | ७० | ड | ९५ | ब |
| २१ | क | ४६ | क | ७१ | ब | ९६ | क |
| २२ | क | ४७ | ब | ७२ | ड | ९७ | ड |
| २३ | क | ४८ | क | ७३ | ब | ९८ | ड |
| २४ | क | ४९ | ब | ७४ | अ | ९९ | ब |
| २५ | अ | ५० | क | ७५ | अ | १०० | क |

RELIABLE ACADEMY 9222333999